N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** गंगाझरी **Year (वर्ष):** 2019
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0051 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/03/2019 19:47 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 12/02/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/02/2019
**Time From (वेळेपासून):** 15:07 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/03/2019 **Time (वेळ):** 19:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 026 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/03/2019 19:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 0.1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** गंगाझरी ,गोंदियी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** चंद्रकुमार लखन वडते
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
(c) **Date/Year of Birth (जन्म** 1991 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

<u>फिर्याद</u>

दिनांक :— १३.०३.२०१९

मी चंद्रकुमार लखन वडते, वय २८ वर्ष, व्यवसाय—शेती, रा. एकोडी, ता. जि. गोंदिया. मो. क्र. ९६८९४९९१७१

मी वर नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहत आहे. मी दि. १२.०२.२०१९. रोजी पोलीस उपअधिक्षक श्री रमाकांत दत्तात्रय कोकाटे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया यांचे समक्ष लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखित करुन त्यावर माझी सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

" मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, गोंदिया येथे येवून तक्रार नोंदवितो की, मी वरील पत्यावर कुटंबासह राहतो व शेतीचे काम करतो.

मी ग्राम एकोडी येथील राहते घरी अंदाजे दोन वर्षापासुन अवैधरित्या देशी दारू विक्रीचा व्यवसाय करीत होतो. त्यावेळी माझा दारू विक्रीचा व्यवसाय सुरळीतपणे सुरू रहावा, याकरीता बिट जमादाराच्या मागणीनुसार मी त्यांना दरमाह रू. १,५००/— देत होतो. त्यानुसार नविन बिट जमादार श्री. चोपकर हे एकोडी बिटमध्ये बिट जमादार म्हणुन आल्यावर त्यांना सुध्दा मी पुर्वीप्रमाणे दरमाह रू. १,५००/— देत होतो. दरम्यानच्या कालावधीत माझा दारू विक्रीचा व्यवसाय मंदावल्यामुळे त्यांना दरमाह रू. १,५००/— देणे मला शक्य झाले नाही, त्यामुळे मी बिट अंमलदार श्री. चोपकर यांना दरमाह रू. १,०००/— देत आहे. श्री. चोपकर हे दर महिन्याच्या ५ ते १० तारखेच्या दरम्यान माझ्या घरी येऊन हप्ता घेवून जातात.

माहे जानेवारी २०१९ मध्ये माझेविरूध्द आबकारी विभागाने अवैधरित्या देशी दारू विक्रीची कार्यवाही केल्यापासुन मी देशी दारू विक्रीचा व्यवसाय बंद केला आहे.

माझा दारू विक्रीचा व्यवसाय बंद असतांना सुध्दा श्री. चोपकर, पोलीस, पोलीस स्टेशन गंगाझरी जि. गोंदिया यांनी दि. ०८.०२.२०१९ रोजी माझ्या घरी येऊन माझ्याकडे रू. १५००/— ची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझ्याविरूध्द आबकारी विभागाकडुन कार्यवाही झाल्यामुळे मी दारू विक्रीचा व्यवसाय बंद केला असल्याचे सांगीतले. त्यावेळी श्री. चोपकर, पोलीस यांनी मला म्हटले की, तु लपुन छपुन दारू विक्री करीत आहेस. तु मला दरमाह रू. १५००/— दिले नाही तर, मी तुझ्याविरूध्द अवैध दारू विक्रीची खोटी कार्यवाही करीन. त्यावर मी त्यांना नाईलाजाने ठिक आहे, सध्या माझेकडे पैसे नाहीत, पैश्याची व्यवस्था झाल्यानंतर आणुन देतो असे सांगीतले.

त्यानंतर दि. ११.०२.२०१९ रोजी मी घरी नसतांना श्री. चोपकर, पोलीस यांनी माझ्या घरी येवुन माझ्या राहत्या संपुर्ण घराची झडती घेतली, परंतु त्यांना माझ्या घरी कोणत्याही प्रकाची दारू मिळुन आली नाही. त्यावर त्यांनी माझ्या भावाकडे मला पोलीस स्टेशनला बोलविल्याचा निरोप देवुन निघुन गेले.

श्री. चोपकर, पोलीस, पोलीस स्टेशन गंगाझरी जि. गोंदिया यांनी माझ्याविरूध्द अवैध दारू विक्रीची कार्यवाही न करण्याकरीता माझेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. १,५००/— मासीक हप्ता त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्यामुळे त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. त्यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही वैमनस्य नाही."

13.3.19

रमाकांत कोकाटे
पोलीस उप अधिक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, गोंदिया

चंद्रकुमार
१३-३-२०१९

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एकोडी,तिरोडा,गंगाझरी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | एकोडी,तिरोडा,गंगाझरी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | देवेंद्र शिवलाल चोपकर | | | 1. नेहरू वार्ड मोहाडी ,ता,मोहाडी,मोहाडी, भंडारा,महाराष्ट्र,भारत<br>2. सहकार नगर तिरोडा,ता तिरोडा,तिरोडा, गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की ,नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदारावर अवैध दारू विक्रीची कार्यवाही न करण्याकरीता पंचा समक्ष रुपये 1500 /- मासीक हप्त्याची मागणी करून ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SHYAM GURUDAS KALE(I (Inspector)) / PCMH91209 **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करुन त्यांची आम्हा परस्परांशी ओळख करुन दिली. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्या तक्रारीबाबत दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझी तक्रार त्यांना वाचावयास दिली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सुचनेवरुन माझ्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व तत्पुर्वी पोलीस उपअधिक्षक कोकाटे यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी पो.स्टे गंगाझरी येथे जावुन करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्र. १ जगदीश बिसेन दिलेल्या सुचनेनुसार माझे खाजगी मोटार सायकलने गंगाझरी गावाचे पुर्वी मजीतपुर फाटयाजवळ जावुन थांबलो. सापळा पथकातील सदस्य माझे मागो—माग आले. त्याठिकाणी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी सापळा पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर सुरु करण्यात आला. व्हाईस रेकॉर्डर कापडी पिशवीत टाकुन माझे गळ्यात लटकवुन दिले व मला पंच क्र. १ सह चोपकर पोलीस, पोलीस स्टेशन गंगाझरी यांचेशी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्याकरीता पोलीस स्टेशन गंगाझरी येथे पाठविण्यात आले.

पोलीस स्टेशन, गंगाझरी येथे चोपकर पोलीस हे न भेटल्यामुळे दिलेल्या सुचनेनुसार मी माझे मोबाईल क्र. ९६८९४९९१७१ वरून चोपकर पोलीस यांचे मो.क्र. ८२०८६४७४१९ वर संपर्क साधुन बोलणी केली. त्यावेळी चोपकर पोलीस यांनी मला पोलीस स्टेशन गंगाझरी येथे भेटण्यास सांगितले. मी व पंच क्र. १ पोलीस स्टेशन, गंगाझारी येथील गेटजवळच थांबुन राहीलो. थोड्यावेळाने चोपकर पोलीस हे पोलीस स्टेशन गंगाझरीच्या गेटजवळ आले. चोपकर पोलीस यांचेशी बोलणी दरम्यान चोपकर पोलीस यांनी माझ्यावर अवैध दारू विक्रीची कार्यवाही न करण्याकरीता माझ्याकडे रू. १,५००/— मासीक हप्ता म्हणनु लाच रक्कमेची मागणी केली व "मी येईन बराबर" असे म्हणुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर पंच क्र. १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण चोपकर पोलीस, पोलीस स्टेशन गंगाझरी यांनी माझ्यावर अवैध दारू विक्रीची कार्यवाही न करण्याकरीता माझ्याकडे रू. १,५००/— मासीक हप्ता म्हणुन लाचेची मागणी केल्याची खात्री केली. पडताळणी कार्यवाही दरम्यान मी त्यांना पैसे घेण्याकरीता उद्या येणार का, असे विचारले असता, त्यांनी " मी येईन मी बराबर, ठिक आहे, थोडसं चौदा पर्यंत माहोल खराब आहे, आं, समजंल का? आजची किती तारीख आहे, बारा, उद्या तेरा, चौदा, दोन दिवस मोहीम आहे तिकडे " असे म्हटले. त्यावरुन चोपकर पोलीस यांचेविरुध्द पुढील सापळा कार्यवाही दि. १५.०२.२०१९ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी मला घ्यावयाच्या दक्षतेबाबत तसेच दि. १५.०२.२०१९ रोजी ला.प्र.वि, गोंदिया कार्यालयात हजर राहण्याबाबत सुचना दिल्या. याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

13.3.19

रमाकांत कोकाटे
पोलीस उप अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, गोंदिया

चंद्रकुमार
13-3-2019

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

चंद्रकुमार
13-3-2090

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): SHYAM GURUDAS KALE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH91209

श्यामराव काळे
सहायक पोलीस निरीक्षक
पो.ठाणे,गंगाझरी

दि. १५.०२.२०१९ रोजी मी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सुचनेनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे हजर आलो. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्याकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रु. १,५००/– (रु. ५००/– दराच्या ३ चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करुन दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस अॅथ्रासीन पावडर लावली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यावर गळ्यातील दुपट्टा काढुन चेहरा पुसुन हातात ठेवण्याचा इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील, असे सांगितले.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचासमक्ष लाचेचा सापळा कार्यवाही ग्राम एकोडी येथे माझे राहते घरी जावुन करण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन अॅथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा माझे फुलप्यांटच्या खिश्यात ठेवण्यात आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ जगदीश बिसेन दिलेल्या सुचनेनुसार माझे खाजगी मोटार सायकलने ग्राम एकोडी गावाच्या कॅनल जवळ येवुन थांबलो. सापळा पथकातील सदस्य माझे मागो–माग आले.

त्याठिकाणाहुन दिलेल्या सुचनेनुसार मी व पंच क्र. १ माझे खाजगी मोटार सायकलने व सापळा पार्टीतील दोन सदस्य आपले वाहनाने ग्राम एकोडी येथील माझे राहते घरी पोहचुन चोपकर पोलीस यांची येण्याची वाट पाहत थांबलो. सापळा पथकातील इतर सदस्य माझे मागो–माग आले. चोपकर पोलीस हे माझे घरी आले नाही तसेच त्यांनी मला संपर्कही केला नाही. त्यावरुन दिलेल्या सुचनेनुसार यापर्वी थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. मी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांना सांगीतले की, दि. २१.०२.२०१९ रोजी माझे राहते गावी एकोडी येथे बाजार असल्याने चोपकर पोलीस हे लाच रक्कम घेण्याकरीता माझ्या घरी येण्याची शक्यता असल्याने पुढिल सापळा कार्यवाही दि. २१.०२.२०१९ रोजी करण्यात यावा. त्यावरुन चोपकर पोलीस यांच्याविरुध्दची पुढील सापळा कार्यवाही सापळा दि. २१.०२.२०१९ रोजी रचण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पोलीस उपअधिक्षक, श्री कोकाटे यांनी मला घरी जाण्यास सांगुन दि. २१.०२.२०१९ रोजी सकाळी ग्राम एकोडी गावाच्या कॅनल जवळ भेटण्याचे सांगीतले. याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

दि. २१.०२.२०१९ रोजी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सांगीतलेप्रमाणे ग्राम एकोडी गावाच्या कॅनल जवळ सकाळी हजर आलो. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्याठिकाणाहुन दिलेल्या सुचनेनुसार मी व पंच क्र. १ माझे खाजगी मोटार सायकलने व सापळा पार्टीतील दोन सदस्य आपले वाहनाने ग्राम एकोडी येथील माझे राहते घरी पोहचुन चोपकर पोलीस यांची येण्याची वाट पाहत थांबलो. सापळा पथकातील इतर सदस्य माझे मागो–माग आले. चोपकर पोलीस हे माझे घरी आले नाही तसेच त्यांनी मला संपर्कही केला नाही. त्यावरुन दिलेल्या सुचनेनुसार यापर्वी थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो.

(signature) 13.3.19

रमाकांत कोकाटे
पोलीस उप अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, गोंदिया

चंद्रकुमार
13-3-2019

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

मी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांना सांगीतले की, चोपकर पोलीस हे लाच रक्कम घेण्याकरीता दरमाह प्रमाणे मार्च महीन्याच्या ५ ते १० तारखेच्या दरम्यान माझ्या घरी मासिक हप्ता घेण्याकरीता येण्याची शक्यता असल्याने त्यांच्या विरुध्द पुढील सापळा कार्यवाही मार्च महीन्याच्या ५ ते १० तारखेच्या दरम्यान करण्यात यावी, असे सांगीतले. त्यावरुन चोपकर पोलीस यांच्याविरुध्दची पुढील सापळा कार्यवाही सर्वानुमते मार्च महीन्याच्या ५ ते १० तारखेच्या दरम्यान करण्याचे ठरवुन तात्पुरती स्थगित करण्यात आली. याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. ३ मध्ये घेतल्या आहेत.

आज दि. १३.०३.२०१९ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे येवुन पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांना कळविले की, दि. ०८.०३.२०१९ रोजी चोपकर पोलीस, पोलीस स्टेशन गंगाझरी यांनी माझ्याविरुध्द पोलीस स्टेशन गंगाझरी येथे अप.क्र. ४४/१९ कलम ६५ (ई), ७७ (अ) मु.दा.का अन्वये गुन्हा दाखल करुन मला अटक केली. मी त्यांचे विरुध्द केलेल्या तक्रारीबाबत त्यांना माझ्यावर संशय निर्माण झाल्याने त्यांनी माझ्याविरुध्द कार्यवाही केली असावी. यापुढे चोपकर पोलीस यांची माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता नाही. तरी चोपकर पोलीस यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही थांबविण्यात यावी, असे पंचासमक्ष सांगितले. त्यावरुन चोपकर पोलीस, पोलीस स्टेशन गंगाझरी यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही थांबविण्यात आली. याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क. ४ मध्ये घेतल्या आहेत.

लोकसेवक देवेंद्र शिवलाल चोपकर, वय ३२ वर्ष, नायक पोलीस शिपाई, ब.नं. १३५५, नेमणुक पोलीस स्टेशन गंगाझरी, जिल्हा गोंदिया यांनी माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारली नसले तरी त्यांनी दि. १२.०२.२०१९ रोजी लाचेच्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझ्यावर अवैध दारू विक्रीची कार्यवाही न करण्याकरीता पंचासमक्ष माझ्याकडे रू. १,५००/— मासिक हप्त्याची मागणी करुन ती लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

चंद्रकुमार
१३-३-२०१९
(श्री. चंद्रकुमार लखन वडते)
रा. एकोडी, ता. जि. गोंदिया

13.3.19
रमाकांत कोकाटे
पोलीस उप अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, गोंदिया

## General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

**Date** 13/03/2019 20:08

**P.S. (पोलीस** गंगाझरी

**State (राज्य):** महाराष्ट्र

**District** गोंदिया

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी** 027
2. **G.D. Date (ठाणे दैनंदिनी** 13/03/2019 20:08 बजे
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी** इतर
4. **Entry for (officer) (प्रविष्टि(अधिकार्यासाठी** SHYAMGURUDASKALE
5. **Case Type (प्रकरणाचा**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**
   यावेळी नोंद घेतो की पो.स्टे गंगाझरी अप क्र 51/019 कलम 7 लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम 1988 हा मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला असुन सदर मुळ कायद्यात 2018 मध्ये संसोधन झाले आहे . लाचलुचपत प्रतिबंध (संसोधन ) अधिनियम 2018 हा कायदा सध्या CCTNS प्रणालीवर अपलोड नसल्याने सदर चा गुन्हा मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला आहे . कलम 7 लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम 1988 यास कलम -7 लाचलुचपत प्रतिबंध (संसोधन ) अधिनियम 2018 असे समजण्यात यावे
7. **Subject (विषय):**
   लाचलुचपत प्रतिबंध (संसोधन ) अधिनियम 2018 हा CCTNS प्रणालीवर अपलोड नसल्याने
8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| S.No.(अ. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on (अहवाल मुद्रित केलेली** 13/03/2019

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**
**Name** SHYAM GURUDAS KALE
**Rank (पद):** I (Inspector)

**Signature**
**Name** SHYAM GURUDAS KALE
**Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):** PCMH91209